# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

**परिपत्रक क्र. ३०९ / २०२३**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ देशातील एक अग्रगण्य विद्यापीठ असून गुणवत्तापूर्ण संशोधन व शिक्षण यात विद्यापीठाचा नावलौकीक आहे. १० फेब्रुवारी १९४९ रोजी स्थापन झालेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या वर्षी आपले अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. यानिमित्ताने मा. व्यवस्थापन परिषदेने केलेल्या ठराव क्र. म:३८८/२०१०२३ नुसार अमृत महोत्सवी वर्षात विद्यापीठाचे विविध प्रशासकीय व शैक्षणिक विभाग, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, परिसंस्था, संलग्न स्वायत्त महाविद्यालये या ठिकाणी आयोजित होणाऱ्या सर्व शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांमध्ये (चर्चासत्रे, कार्यशाळा, परिषदा, विविध स्पर्धा, सभा. इ) दैनंदिन पत्रव्यवहार, प्रशासकीय कामकाज व शैक्षणिक कामकाजामध्ये मान्यता प्राप्त बोधचिन्हाचा (Logo) वापर करावा.

संदर बोधचिन्हाचा (Logo) विद्यापीठाच्या पत्रव्यवहारासाठी वापर करण्याचे कटाक्षाने पालन करावे. तसेच सर्व कार्यालयांमध्ये, विभागांमध्ये दर्शनी भागात बॅनर प्रदर्शित करण्यात यावेत.

सोबत :- मान्यताप्राप्त बोधचिन्हाची (Logo) प्रतिकृती

प्रा.(डॉ.) विजय खरे
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जावक क्र. एएन / ४१९
दिनांक - १२/१२/२०२३

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-
१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग
३. मा. प्राचार्य / मा. संचालक विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये, परिसंस्था व संशोधन केंद्रे
४. मा. संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी / कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

75

Years of Excellence

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

|| यः क्रियावान् स पण्डितः ||